RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : २४

दि. १३ मे २०२६, वार : बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.


# दैनिक महावृत्त


E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


# बुध्द विहार हे संस्कार व परिवर्तनाची केंद्रे आहेत!

## इंजी.अनिलकुमार गायकवाड यांचे प्रतिपादन

**अहमदपूर :** बुद्ध विहार ही केवळ प्रार्थना व उपासनेची स्थळे नसून ती समाजाच्या संस्कारांची, विचारांची आणि परिवर्तनाची केंद्रे आहेत. बुद्ध विहारातून समाजाला अभिप्रेत असणारा निष्ठावान, चारित्र्यवान व अभ्यासू उपासक निर्माण होतो. आजच्या काळात बुद्ध विहार हेच खऱ्या अर्थाने संस्कार केंद्र बनले असून त्यांच्या सर्वांगीण विकासाची नितांत आवश्यकता आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा कार्यकारी संचालक इंजिनिअर अनिलकुमार गायकवाड यांनी केले.

ते अहमदपूर येथील तक्षशिला बुद्ध विहार, काळेगाव येथे आयोजित श्रामनेर शिबीर समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मतदारसंघाचे माजी आमदार बब्रूवान खंदाडे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड,इंजीनिअर ढवळे साहेब, गोपीनाथराव जोंधळे,बाबूराव बोडके यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तक्षशिला बुद्ध विहाराचे प्रमुख पूज्य भंते महाविरो थेरो यांनी उपस्थितांना त्रिशरण पंचशील दिले.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवक नेते तथा धम्म उपासक डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले. यावेळी त्यांनी तक्षशिला बुद्ध विहाराच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या मास्टर प्लॅनची माहिती दिली. विहाराकडे ये-जा करण्यासाठी कायमस्वरूपी सिमेंट काँक्रेट रस्ता, विपश्यना केंद्र,सभागृह तसेच इतर तद्नुषंगिक विकासकामांसाठी शासनाकडून निधी मंजूर करण्यात यावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.





याप्रसंगी बोलताना माजी आमदार बब्रुवान खंडाडे यांनी बुद्ध विहाराच्या विकासासाठी शासन स्तरावरून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही दिली.तसेच इंजिनिअर अनिलकुमार गायकवाड यांनीही विहाराच्या विकासासाठी निधी मंजुरीसाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमास परिसरातील बौद्ध उपासक, सामाजिक कार्यकर्ते, युवक वर्ग, श्रामनेर,भिख्खू संघ तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी तूरेवाले यांनी केले तर आभार प्रा.डी.बी.शिंदे यांनी मानले.

# ज्येष्ठ पत्रकार राजहंस कांबळे यांचा कै. अनंत भालेराव स्मृती पुरस्काराने गौरव



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर व धाराशिव जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या प्रश्नांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून सातत्याने वाचा फोडणारे दैनिक एकमतचे उपसंपादक तथा ज्येष्ठ पत्रकार राजहंस कांबळे यांना प्रतिष्ठेचा कै. अनंत भालेराव स्मृती पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते धाराशिव येथे प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि सपत्नीक सत्कार करून हा सन्मान प्रदान करण्यात आला.

गेली तब्बल २५ वर्षे पत्रकारितेच्या क्षेत्रात निष्ठेने कार्यरत राहून राजहंस कांबळे यांनी समाजातील अनेक ज्वलंत प्रश्नांवर निर्भीडपणे लेखन केले आहे. त्यांनी केवळ बातम्या दिल्या नाहीत, तर अन्यायग्रस्त, वंचित, शोषित आणि गोरगरिबांच्या वेदनांना शब्द दिले. त्यांच्या लेखणीतून प्रशासनाला जाग आली, अनेक प्रश्न मार्गी लागले आणि अनेकांना न्याय मिळाला. विशेष म्हणजे एखाद्या सामाजिक प्रश्नावर त्यांनी सातत्याने बातम्यांची मालिका चालवून संबंधित यंत्रणेला उत्तरदायी बनवले. शिक्षण, आरोग्य, ग्रामीण समस्या, शेतकरी प्रश्न, सामाजिक अन्याय, प्रशासनातील त्रुटी अशा विविध विषयांवर त्यांनी सखोल आणि अभ्यासपूर्ण लेखन केले. पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले.

त्यांच्या कार्यामागे समाजाप्रती असलेली खरी तळमळ, संवेदनशीलता आणि प्रामाणिकपणा स्पष्टपणे दिसून येतो. लोकहितासाठी संघर्ष करण्याची वृत्ती, सत्यासाठी उभे राहण्याचे धैर्य आणि दुर्बल घटकांसाठी न्याय मिळवून देण्याची धडपड ही त्यांची खरी ओळख ठरली आहे.

धाराशिव जिल्ह्याने त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार प्रदान करून त्यांच्या योगदानाचा गौरव केला आहे. हा सन्मान केवळ राजहंस कांबळे यांचाच नसून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पत्रकारितेचाही सन्मान मानला जात आहे.

या आनंददायी प्रसंगी त्यांचे मित्र राहुल गायकवाड, पवन कांबळे सेलूकर, पत्रकार अजय असोपा आणि मयूर उपाध्ये यांनी त्यांचा विशेष सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ''राजहंस कांबळे यांची लेखणी अशीच समाजहितासाठी चालत राहो,'' अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

त्यांच्या या यशामुळे पत्रकारिता क्षेत्रात कार्य करणाऱ्या नव्या पिढीला प्रेरणा मिळत असून, समाजासाठी लिहिणाऱ्या लेखणीचा सन्मान आजही जिवंत असल्याचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

# खरीप हंगाम २०२६-२७ करिता बियाणे वितरण आणि पीक प्रात्यक्षिकांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** सन २०२६-२७ च्या खरीप हंगामासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (तेलबिया), राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान, तसेच कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अभियानांतर्गत प्रमाणित बियाणे वितरण आणि पीक प्रात्यक्षिकांसाठी महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. गळीतधान्य, अन्नधान्य, तृणधान्य, भरडधान्य आणि कडधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढवणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना सुधारित वाणांचे दर्जेदार बियाणे वेळेवर उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर ही पावले उचलली जात आहेत. खरीप हंगामातील तूर, मूग, उडीद, मका, ज्वारी आणि सोयाबीन यांसारख्या प्रमुख पिकांसाठी १० वर्षांखालील आणि १० वर्षांवरील वाणांचे बियाणे वितरित केले जाणार आहे. यासोबतच पीक प्रात्यक्षिकांसाठी देखील शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्रमाणित बियाणे संच (मिनीकीट) वितरणाची प्रक्रिया 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर राबविली जाणार आहे. यासाठी १० एप्रिल २०२६ पासून महाडीबीटी पोर्टलवर अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाऊन तातडीने आपले ऑनलाइन अर्ज सादर करावेत, जेणेकरून त्यांना या योजनांचा वेळेत लाभ घेता येईल. शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी आपल्या संबंधित तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा महाडीबीटी पोर्टलला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

# लातूर ग्रामीण मतदार संघातील एकोणीस देवस्थानांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून 'क' दर्जा प्राप्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावातील एकोणीस देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकासाचा ''क'' दर्जा प्राप्त झाला आहे. क दर्जा प्राप्त झाल्याने त्या त्या गावातील देवस्थानाचा सर्वांगीन विकास होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विविध विकास कामांना मान्यता देण्यात आली आहे. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावच्या विविध देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकासाचा ''क'' दर्जा देऊन भाविक भक्तांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.



आ. रमेशआप्पा कराड यांच्या मागणीनुसार लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान जवळा बु, श्री संत माधव मामा ज्ञानेश्वरी संस्थान मठ पानगाव, श्री विघ्नहर्ता दत्त मंदिर भाडगाव, श्री गुप्तलिंग महादेव मंदिर दगडवाडी, श्री मुकुट शहावली दर्गा मुशिराबाद, श्री खंडोबा मंदिर बिंदगीहाळ, श्री मनमत स्वामी देवस्थान भातांगळी, श्री लक्ष्मी मंदिर बोकणगाव, श्री महेबूब सुबानी दर्गा बोरी, श्री आत्मलिंगेश्वर महादेव मंदिर बोरी, श्रीकृष्ण मंदिर उमरगा, श्री खंडोबा मंदिर बामणी, श्री काशीविश्वेश्वर विठ्ठल रुक्मिणी मंदिर भडी, श्री खंडोबा मंदिर भातखेडा, श्री हनुमान मंदिर चिकलठाणा, श्री खंडोबा मंदिर भातांगळी, श्री विठ्ठल मंदिर ममदापूरपाटी, श्री नत्तरशहाबाबा दर्गा बोरी, श्री खंडोबा मंदिर ममदापूर अशा एकूण एकोणीस विविध देवस्थानचा शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेत समावेश करण्यात आला आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील तब्बल एकोणीस विविध देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकास योजनेचा ''क'' दर्जा मिळवून दिल्याबद्दल भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भाजपाच्या कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत.

# ज्योतीराव फुलेना 'महात्मा' पदवी दिली ते ठिकाण शासनाने हेरीटेज स्मारक करावे

**मुंबई/ प्रतिनिधी** – मुंबई देशस्थ मराठा ज्ञाती धर्मसंस्था मांडवी कोळीवाडा (स्थापना १८३०) या संस्थेच्या सभागृहात ११ मे १८८८ रोजी मुंबईतील कष्टकरी कामगाराच्या वतीने ज्योतीराव फुले यांना ''महात्मा'' ही पदवी देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्याला १ मे २०२६ रोजी १३८ वर्ष पूर्ण झाले. त्या निमित्ताने मुंबई ठाणे जिल्ह्यातील महात्मा ज्योतिबा फुले यांचे वैचारिक निष्ठावंत सामाजिक कार्यकर्ते एकत्र येऊन त्यांनी ११ मे महात्मा ज्योतीराव फुले उत्सव दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला.

या ऐतिहासिक घटनेचा उत्सव क्रांतिकारी विचारांचे समाजसुधारक ज्योतीराव गोविंदराव फुले यांना ११ मे १८८८ रोजी मुंबईतील मांडवी कोळीवाड्यात (मसजीद बंदर) आयोजित सभेत जनतेने महात्मा ही पदवी बहाल केली होती.रावबहादूर





वंडेकर यांनी या सभेचे आयोजन केले होते.स्त्रीशिक्षण,जातिव्यवस्थेचा विरोध आणि शोषितांसाठी केलेल्या कार्यमुळे त्यांना हा सन्मान मिळाला होता.त्या निमित्ताने ११ मे २०२६ रोजी,१३८ व्या उत्सव दिनी त्याचं ठिकाणी महात्मा फुलेची प्रतिमा,पगडी व त्यांच्या जीवन संघर्षावर लिहलेले पुस्तकांची मांडणी करून अभिवादन करण्यात आले.

ज्योतीराव गोविंदराव फुले यांच्या प्रतिमेला कामगार नेते श्री.सागर रामभाऊ तायडे अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना.व श्री.सुरेश ढोबळे ट्रस्टी सरचिटणीस मुंबई देशस्थ मराठा ज्ञाती धर्मसंस्था मांडवी कोळीवाडा यांनी पुष्पहार अर्पण करून पगडीला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आले.

त्यावेळी श्री सुदाम गाडेकर लेखक (महाराष्ट्र शासन गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित) श्री.श्रीकांत माळी निष्ठावंत सामाजिक कार्यकर्ते,श्री.सदानंद मंडलिक अध्यक्ष अखिल भारतीय म फुले समता परिषद मुंबई, श्री.सुधीरशेट कांडपिळे अध्यक्ष फुल माळी समाज पनवेल,श्री.गोपीनाथ लोखंडे (रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे वंशज पणतू ),श्री.बाळासाहेब लोखंडे अध्यक्ष रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे प्रतिष्ठान,श्री.राहुल काळे खजिनदार मुंबई देशस्थ मराठा ज्ञाती धर्मसंस्था मांडवी कोळीवाडा,श्री.जगन्नाथ कुदळे (जे के) निष्ठावंत सामाजिक कार्यकर्ते,श्री.यशवंत ओव्हळ मा.अधिक्षक आय ए एस ट्रेनिंग सेंटर,आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते,श्री.विश्वास ताम्हाणे निष्ठावंत सामाजिक कार्यकर्ते ,श्री.नवनीत सिनलकर सल्लागार,सुरेश कांबळे माझगाव सामाजिक संघटना,वामन गारडे संत शिरोमणी सावता माळी मंडळ कोपरखैरने नवी मुंबई, विनोद कदम,किसन काळे,हेमंत वायाळ,प्रशांत वारुळे ज्ञानेश्वर सोलाट,उपस्थित होते.

निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या वतीने सुदाम गाडेकर यांनी व ट्रस्टीच्या वतीने सुरेश ढोबळे यांनी शाल श्रीफळ देऊन मान्यवरांचा सत्कार केला..सूत्र संचालन सुदाम गाडेकर यांनी केले तर शैलेन्द्र माळी यांनी आभार मानले.

मुंबई देशस्थ मराठा ज्ञाती धर्मसंस्था मांडवी कोळीवाड्याचे ट्रस्टी यांनी ती ऐतिहासिक जागा उपलब्ध करून मोलाचे सहकार्य केले. म्हणूनच ११ मे २०२६ रोजी महात्मा ज्योतीराव फुले पदवी उत्सव दिन मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला.शासनाच्या वतीने या ऐतिहासिक घटनेची नोंद घेऊन मोठा उत्सव साजरा झाला पाहिजे होता. आणि ज्योतीराव फुलेना ''महात्मा'' पदवी दिली ते ठिकाण शासनाने हेरीटेज स्मारक केले पाहिजे अशी सुदाम गाडेकर यांनी मागणी केली त्याला सर्व मान्यवरांनी पाठिंबा दिला.आणि त्यासाठी महात्मा फुलेंचा वैचारिक वारसा सांगणाऱ्या सर्व निष्ठावंत कार्यकर्त्यांनी,संस्था,संघटनांनी शासन दरबारी पत्र व्यवहार करा असे आवाहन केले.

# लातूर येथे १५ मे रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योगकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, १५ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता एका भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बँकिंग, फायनान्स आणि इन्शुरन्स क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी आयोजित हा मेळावा लातूर जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या येथे होणार आहे. या मेळाव्यामध्ये क्रेडिट क्सेस ग्रामीण लि. (लातूर), श्रीराम फायनान्स लिमिटेड (लातूर), नीट लि. (पुणे) आणि पेटीएम (लातूर) यांसारख्या नामवंत आस्थापना सहभागी होणार असून त्या पुणे व लातूर येथील रिक्त पदांसाठी प्रत्यक्ष मुलाखती घेणार आहेत. या भरती प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी १० वी, १२ वी उत्तीर्ण तसेच कोणत्याही शाखेचे पदवीधर किंवा पदव्युत्तर पदवी शिक्षण पूर्ण केलेले उमेदवार पात्र ठरणार आहेत. याव्यतिरिक्त, तरुणांना शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळावी यासाठी मेळाव्यात 'प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना' चा स्वतंत्र स्टॉल देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी १५ मे रोजी सकाळी १० वाजता स्वखर्चाने या मेळाव्याला उपस्थित राहावे. येताना शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा रिझ्युम, बायोडाटा आणि पासपोर्ट आकाराचे फोटो यांच्या किमान तीन प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त नि. ना. सूर्यवंशी यांनी केले आहे.

संपादकीय...

## भ्रष्टाचारामुळे देश पोखरला

भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड असून जनतेच्या सहभागाविना भ्रष्टाचाराचा हा राक्षस समाजामधून हद्दपार होऊ शकत नाही, हे वास्तव आहे. आजमितीस भ्रष्टाचार हा शिष्टाचार समजला जात असला, तरी भविष्यामध्ये देश आणि समाजावर त्याच्या होणार्या घातक परिणामाची चिंता व चिंतन करताना कोणीच दिसून येत नाही. समाजामध्ये असलेली कमालीची उदासीनता असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे भ्रष्टाचार करणार्यांचे सहज फावते आणि ही मालिका अविरत सुरू राहते. भ्रष्टाचारामुळे देश पोखरला गेला आहे. तो सहन न करण्याचे व त्या विरोधात कठोर कारवाई करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचे धोरण आहे. सुरुवातीपासूनच हा विषय नरेंद्र मोदी त्यास प्राथमिकता देऊन प्राधान्याने आहे. देशाला व सामान्य जनतेला लुटणार्या भ्रष्ट लोकांना कदापिही सोडले जाणार नाही, या धोरणास त्यांनी प्राथमिकता देऊन हा लढा अधिक तीव्र केला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध लढताना मोदींच्या मनातील तळमळ अनेकदा देशवासीयांनी अनुभवली आहे. अनेकदा याबाबत त्यांनी देशवासीयांसमोर आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. त्यामुळे या लढाईमध्ये देशामधील सामान्य जनतेचे सहकार्यही त्यांना आहे. सामान्य जनतेच्या सहकार्याविना हा लढा जिंकणे अशक्य असल्याने त्यांच्या या लढ्यामध्ये प्रत्येकाने आपला सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराची सुरुवात समाजाच्या मूकसंमतीनेच होत असते, हे उघड आहे. त्यामुळे भ्रष्टाचार करणार्यांचे चांगलेच फावते. यापुढे आपल्या आयुष्यामध्ये भ्रष्टाचाराला थाराच देणार नाही, असा ठाम निर्धार करून अशी शपथ जर प्रत्येकाने घेतली तर लढ्याला अधिक बळ मिळून देशाची वाटचाल एक भ्रष्टाचारमुक्त देश म्हणून सहज होऊ शकते. जनतेच्या सहकार्यानेच या लढ्याला यश मिळू शकते. भ्रष्टाचाराच्या विरोधात लढताना पंतप्रधानांनी कोणाचीही तमा न बाळगता व विरोधकांच्या हल्ल्याची पर्वा न करता हा लढा निर्धारपूर्वक सुरू ठेवला आहे. भ्रष्टाचारमुक्त भारत हे त्यांचे स्वप्न आहे. नरेंद्र मोदी यांच्या पाऊल ठेवून राज्य शासनानेही भ्रष्टाचार विरोधातील लढ्यास गती देणे आवश्यक आहे. हा लढा लढण्यास सहज आणि सोपा नाही, याची जाणीव सर्वांनाच आहे. या लढ्यामध्ये स्वकीयांशीच दोन हात करावे लागणार आहे. त्यासाठी तारेवरची कसरत करून पुढे जावे लागणार आहे. ही वाट अतिशय बिकट आहे. याची जाणीव असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी तमा न बाळगता गोरगरिबांच्या हितासाठी अधिक तीव्रतेने हा लढा पुढे रेटत आहेत. कोणतेही शासकीय काम सहजासहजी होत नाही, हा आजवरचा नागरिकांचा अनुभव आहे. ग्रामीण भागातील तळहातावर पोट घेऊन जगणार्या व रोजमजुरीवर काम करून जगणार्या गरिबांना शासकीय कार्यालयाचे उंबरठे रोज झिजविणे परवडणारे नसते. एखाद्या लहानशा कामासाठी रोजमजुरी पाडून दिवसभर कार्यालयामध्ये बसणे हे त्यांच्या कुटुंबासाठी उपासमारीचे कारण ठरू शकते. गोरगरिबांची नेमकी हीच असहायता हेरली जाते आणि नकळत असे गोरगरीब भ्रष्टाचाराच्या आहारी जातात. त्यांच्यापुढे पर्यायच उपलब्ध नसतो. त्यामुळे आज भ्रष्टाचारास शिष्टाचाराचे स्वरूप प्राप्त झाल्याचे बघावयास मिळत आहे. पंतप्रधान मोदी यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध आपली दिशा स्पष्टपणे ठरविली आहे. त्यांच्या जवळपास ११ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये घोटाळा न घडणे, हे त्यांच्या यशाचे आणि ठाम निर्धाराचे श्रेय आहे. या देशाने यापूर्वी अनेक घोटाळ्यांची मालिका अनुभवली आहे. त्यामुळे आपल्या देशामध्ये काळ्या पैशाची एक समांतर मालिका उभी राहिली होती. मोदींच्या या ठाम निर्धाराने देशामधील अनेक बडे राजकारणी मोदींच्या या अस्त्राने घायाळ झाले असून आपली वर्षानुवर्षे चालणारी दुकानदारी बंद ते सध्या चवताळले आहेत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वाट्टेल ते आरोप करून त्यांना बदनाम करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येत आहे. विरोधकांची ही दुटप्पी चाल जनताही ओळखून आहे. त्यामुळे मोदी विरोधकांचे धाबे दणाणले आहेत, एवढे मात्र नक्की.

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत : सोमनाथची गाथा

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थितीहे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच 'सोमनाथचंद्राचा अधिपती' हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधीलाकूड आणि गवताचीअसली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तीच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहेसोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.

पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.

त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.

१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन ''भक्ती आणि लज्जा'' असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: ''या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे.''

जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.

यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.

दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला 'हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.

१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे.

त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माणमैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना ''ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू'' हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणेपुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो

''आम्ही अजूनही येथे आहोत.
आम्ही स्मरण ठेवतो.
आम्ही पुन्हा उभारतो.
आम्ही टिकून राहतो.''

-----------------

**ब्रिजेश सिंह**
प्रधान सचिव तथा महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# बलात्कारी व भ्रष्टाचारी यांना तुरुंगात नाही; तर फास्टट्रॅक कोर्टच्या माध्यमातून फासावर लटकविले पाहिजे

देशाचे अट्टल गुन्हेगार लैंगिक अत्याचारी व भ्रष्टाचारी आहेत कारण या दोन्ही गुन्हेगारांनी देशाचे संपूर्ण वाटोळे केले आहे. अत्याचाऱ्यांनी देशाच्या सभ्यतेवर व संस्कृतीवर काळीमा फासला;तर भ्रष्टाचाऱ्यांनी देशाच्या गोरगरीब जनतेचे रक्त पिऊन देशाला हवालदिल केले आहे.देशात वाढते मुलींवरील व महिलांवरील अत्याचार,मुलींचे व महिलांचे अपहरण या घृणास्पद वाढत्या घटनेने देश हादरला आहे. परंतु अत्याचाराच्या घटना थांबायला तयार नाही.महाराष्ट्रात दररोज २७ मुली ठरतात वासनेचा बळी,यावरून आपण समजू शकतो की देशात २८ राज्य आणि ८ केंद्रशाशित प्रदेश आहेत याही ठिकाणी असे अनेक घृणास्पद घटना मोठ्या प्रमाणात घडत असाव्यात यात तिळमात्र शंका नाही.देशातील वाढत्या अत्याचारामुळे व अपहरणाच्या घटनांमुळे समाजातील वातावरण भयभीत झाले असून सर्वसामान्यांनमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.तोच प्रकार भ्रष्टाचाराच्या बाबतीत आपल्याला पाहायला मिळतो.कारण देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे देशात अनेक गंभीर समस्या निर्माण होऊन १४० कोटी जनतेचे वाटोळे होत आहे व आजच्या परिस्थितीत भारत भ्रष्टाचाराच्या बाबतीत जगात अव्वल स्थानावर आहे त्यामुळेच देशात महागाने उच्चांक गाठला आहे.

देशातील भ्रष्टाचारी गोरगरीबांचे, शेतकऱ्यांचे, सर्वसामान्यांचे, मजुरांचे रक्त पिऊन आज गडगंज झाले आहेत व आपला संपूर्ण पैसा देश-विदेशात गुंतवून ठेवला आहे.आज मुठभर भ्रष्टाचाऱ्यांमुळे देशांचे संपूर्ण वाटोळे होत आहेत यात सर्वात जास्त राजकीय पुढारी दिसून येतात.असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) च्या २०२४ च्या अहवालानुसार,सध्याच्या लोकसभेत सुमारे ४४% (सुमारे २४० पेक्षा जास्त) खासदारांनी त्यांच्यावर गंभीर फौजदारी गुन्हे दाखल असल्याची माहिती स्वतःच्या शपथपत्रात दिली आहे.

यातील अनेक गुन्हे हे भ्रष्टाचाराशी, आर्थिक गैरव्यवहारांशी आणि इतर गंभीर प्रकरणांशी संबंधित आहेत.यावरून स्पष्ट होते की, भ्रष्टाचाराचे व गुन्हेगारीचे सुत्रधार राजकीय पुढारीच आहेत.त्यामुळेच आज भ्रष्टाचाराची किड संपूर्ण क्षेत्रात लागलेली दिसून येते यामुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत अवघड व कठीण झाले आहे. आज देशातील वाढती महागाई, बेरोजगारी, महागडे शिक्षण, महागडी आरोग्य सुविधा, वाढते कुपोषण, भुकमरी या संपूर्ण घटना वाढत्या भ्रष्टाचारामुळे निर्माण झाल्या आहेत आणि याचे प्रायश्चित्त देशाची १४० कोटी जनता आजही भोगत आहे.आज आपण पहातो की, मुठभर भ्रष्टाचारी करोडोंचे भ्रष्टाचार करून आणि



त्यांच्या कारणाम्याची हजारो कागदांची फाईल बनुनही निर्दोष सुटतात व हेच भ्रष्टाचारी आज आपल्याला सत्तेमध्ये दिसून येतात. भ्रष्टाचाऱ्यांवर भ्रष्टाचाराच्या अनेक केसेस दाखल असतांना सुध्दा त्यांना अचानक सरकारचा आश्रय मिळतो व सरकारकडून त्यांना क्लीन चिट दिली जाते आणि हेच भ्रष्टाचारी देशाच्या १४० कोटी जनतेला ग्यान पाजतांना दिसतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.आज देशात दररोज बलात्काराच्या, मुलींवरील अत्याचाराच्या व अपहरणाच्या महाभयानक घटना दररोज होतांना आपण पहातो.परंतु यांच्यावर कठोर कारवाईचे प्रावधान नसल्याने अनेक गुन्हेगार खुलेआम फिरताना दिसतात व कोर्टामध्ये तारीख पे तारीख असा लपंडाव दिसून येतो.आसाराम बापू ला एक अल्पवयीन मुलीवर बलात्काराच्या आरोपाखाली जोधपुर पुलिस ने ३१ऑगस्ट २०१३ ला इंदौर आश्रम मधुन कैद केले होते तेव्हा पासून तर आज पर्यंत जेलमध्येच आहे परंतु कठोर शिक्षा किंवा फाशीच्या शिक्षेचा काहीही अतापता नाही.

त्याचप्रमाणे२०१७ चा उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपी कुलदीप सेंगर याला अजून पर्यंत फाशीची शिक्षा किंवा कठोर शिक्षा ठोठावण्यात आली नाही हेही देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.असे अनेक मोठमोठे दिग्गज देशात आहे की त्यांनी घृणास्पद कृत्य केले आहे परंतु कारवाई मात्र शुन्य आहे.असे अनेक प्रकार देशात घडले आहे व घडत आहे परंतु पिडीतांना अजूनपर्यंत न्याय मिळालेला नाही. उन्नाव बलात्कार प्रकरण जर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चालविले असते तर आतापर्यंत कुलदीप सेंगर फासावर लटकला असता. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की काही लोक सत्तेच्या पडद्याआड अनेक घृणास्पद कृत्य करीत असतात.तेच काम कुलदीप सेंगरने सत्तेमध्ये असतांना २०१७ मध्ये केले.

अशाप्रकारे देशात अनेक अत्याचाराच्या घटना आहेत की राजकीय आश्रयामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच नाही आणि होणारही नाही.आतातर मुलींवरील व महिलांवरील अत्याचारांच्या बाबतीत भोंदूबाबांनी कळस गाठल्याचे दिसून येते दररोजच्या वृत्तपत्रात व मिडियाच्या माध्यमातून घृणास्पद प्रकरण उघडकीस येत आहे.त्यामुळे आता देशात वाढते अत्याचार पहाता; पोलिस विभागाला खुली सुट देऊन त्यांचा एन्काऊंटर किंवा फासावर लटकविने हाच पर्याय सरकारने स्वीकारला पाहिजे. आजही अनेक भोंदूबाबा व कूलदिप सेंगर सारखे अनेक राजकीय पुढारी राजकीय आश्रयाखाली जेलमध्ये शाही जिंदगी जगत आहे. परंतु त्यांना अजुनपर्यंत फाशीची शिक्षा किंवा कठोर शिक्षा ठोठावण्यात आली नाही हेही भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.या कारणांमुळेच देशात मुलींवरील व महिलांवरील अत्याचारामध्ये मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ झाल्याचे दिसून येते. बलात्कारी आणि भ्रष्टाचारी यांच्यात यत्किंचितही फरक नाही कारण बलात्कारी हा संपूर्ण समाजाला कलंकित करून १४० कोटी जनतेवर आघात करतो;तर भ्रष्टाचारी हा भ्रष्टाचाराच्या माध्यमातून करोडोंची संपत्ती देश-विदेशात जमा करून १४० कोटी जनतेचे कळतनकळत रक्त पित असतो व संपूर्ण समाज व्यवस्थेला आर्थिक नुकसान पोहचवुन पोखरत असतो.देशात शक्ती कायद्यात गुन्हेगाराला २१ दिवसांत फाशी देण्याची तरतूद आहे.मात्र दुर्दैवाने हा कायदा केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित असल्याचे सांगितले जाते.

आज शक्ती कायदा राज्यासह देशात लागू असता तर उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपीं कुलदीप सेंगर किंवा नसरापूरच्या नराधमाला किंवा अन्य बलात्काऱ्याला २१ दिवसांत फाशीची शिक्षा झाली असती आणि अशा गंभीर गुन्हेगारांवर कायद्याचा धाक बसला असता. परंतु देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की असा कायदा अमलात आणण्यासाठी राजकीय पुढारीच हिचकीचावतात. त्यामुळे आज बलात्कार प्रकरणातील भोंदूबाबा,कुलदिप सेंगर सारखे अनेक राजकीय पुढारी व बाहुबली हे राजकीय आश्रयाने जेलमध्ये शाही जिंदगी जगत आहे .यांना तर फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे होती परंतु हे देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

आज देशात वाढते अत्याचार व भ्रष्टाचार पहाता यांच्यासाठी फक्त फाशीच्याच शिक्षेचे प्रावधान असायला हवे.कारण या दोन्ही घटना समाजाला लागलेली किड आहे.यावर नियंत्रण तेंव्हाच संभव आहे की, अशा अट्टल गुन्हेगारांना फाशीची शिक्षा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत यात सुधारणा शक्य नाही.अट्टल गुन्हेगार,बलात्कारी,भ्रष्टाचारी, विविध गुन्हेगार अशा कैद्यांना सुधारण्याची संधी म्हणून कुटुंबातील व्यक्तीचे आजारपण,विवाह किंवा मृत्यू प्रसंगी पॅरोल किंवा फर्लो देण्याची तरतूद देशाच्या अनेक राज्यात आहे.परंतु देशातील अनेक राज्यांतील कैदी पॅरोल किंवा फर्लो वर असणारे अनेक कैदी अजुनही फरार असल्याचे सांगितले जाते.परंतु मी म्हणतो की, अशा अट्टल गुन्हेगारांना पॅरोल किंवा फर्लो का म्हणून द्यायचा? ज्यांना गुन्हा करतांना समाजाची किंवा देशाच्या जनतेचा आत्मा दुःखावण्याची थोडीशीही जाणीव नाही किंवा लाज वाटत नाही अशांना का म्हणून मोकळीक द्यायची!त्यामुळे वाढत्या भयावह घटना व मुलींवरील अत्याचार पहाता अट्टल गुन्हेगारांना सजा-ए-मौत हीच एकमेव सजा असायला हवी.

देशात लैंगिक अत्याचार, बलात्कारी, अट्टल गुन्हेगार यापेक्षा सर्वात मोठे गुन्हे देशात घर करून बसले आहेत ते गुन्हेगार म्हणजे ''भ्रष्टाचारी'' आज देशाला व देशाच्या १४० कोटी जनतेला मुठभर भ्रष्टाचाऱ्यांनी पोखरून टाकले आहे. आज देशात भ्रष्टाचार येवढा उफाळलेला आहे की गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पित आहे.त्यामुळे यांचा एन्काऊंटर होने किंवा फासावर लटकविले अत्यंत गरजेचे आहे यासाठी पोलीस विभागाला मोकळीक असने आवश्यक आहे.देशात भ्रष्टाचाराची जळे-मुळे सर्वात जास्त राजकीय वर्तुळात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्यामुळे पोलिस विभागाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांच्या केसालाही धक्का लागत नाही व कायद्याच्या चाकोरीतून तारीख पे तारीख असा लपंडाव सुरू रहाते व कालांतराने सुटका होते.यालाही आश्चर्यच म्हणावे लागेल. आज भ्रष्टाचारी करोडो,अरबो रूपये घेऊन देशांच्या बाहेर फरार होतात आणि झाले आहेत.परंतु आपण काहीच करू शकत नाही व हातावर हात ठेवून बसुन राहातो.ही सुद्धा आपली शोकांतिका म्हणावी लागेल. मी केंद्र सरकारला व देशातील संपूर्ण राज्य सरकारांना विनंती करतो की, लैंगिक अत्याचार, मुलींचे आणि महिलांचे अपहरण करणारी टोळी व भ्रष्टाचारी यावर आळा घालण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून किंवा शक्ती कायद्याच्या माध्यमातून गुन्हेगारांना फासावर लटकविले पाहिजे.जय हिंद.

-----------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## संक्षिप्त...

### पोलिस पाटील संघटनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी कृष्णा कदम यांची निवड; सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील धर्माळा या गावातील अतिशय शांत सयमी स्वभावाचे कृष्णा अशोक कदम यांची पोलिस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड झाली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,११ मे २०२६ रोजी धर्माळा गावचे कृष्णा कदम यांची पोलिस पाटील संघटनेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून,ही निवड पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष दीपक पालीवाल यांच्या आदेशाने झाली आहे. कृष्णा कदम यांच्या निवडीमुळे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### काळेगाव हायस्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के ; ७ विद्यार्थिनींची ९० टक्क्यांहून अधिक गुणांची कमाई





**केज/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिकशिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात काळेगाव येथील काळेगाव हायस्कूलने आपल्या यशाची परंपरा कायम राखत १०० टक्के निकाल लावला आहे. विशेष म्हणजे, विद्यालयातील ७ विद्यार्थिनींनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवून सुवर्णयश संपादन केले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांची यशोगाथा विद्यालयाच्या निकालात विद्यार्थिनींनी बाजी मारली असून, प्रथम तीन क्रमांकाचे मानकरी पुढील प्रमाणे आहेत.प्रथम क्रमांक कु. आगे वेदिका गजानन ९३.४०%,द्वितीय क्रमांक कु.कोठावळे पुजा दत्तात्रय ९२.६०%,तृतीय क्रमांक कु.कोठावळे वेदिका संतोष ९२.००% आणि कु.गिराम वैष्णवी शिवलिंग ९२.००% या व्यतिरिक्त कु.राऊत श्रद्धा शिवदास९१.६०%, कु.सुकाळे अनुष्का सतीश ९१.२०% आणि कु.तुपारे श्रावणी भागवत ९०.००% यांनी देखील नव्वदीचा टप्पा ओलांडला आहे. विद्यालयातील एकूण १६ विद्यार्थी ८५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सखाहारी तात्या गदळे, सचिव जयदत्त गदळे, संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक, प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची मेहनत आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच शाळेने १०० टक्के निकालाचा टप्पा गाठला आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे, असे मत प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांनी व्यक्त केले.या यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून,त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा २०२६

## मानाच्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी बदलापूर सज्ज

## बुधवारी भव्य उद्घाटन, राज्यभरातील ३८४ खेळाडूंचा सहभाग; २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे, १३ ते १७ मे कालावधीत रंगणार थरार

**ठाणे,दि.१२(जिमाका):** प्रतिष्ठेच्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी बदलापूर शहर सज्ज झाले असून १३ ते १७ मे २०२६ कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेसाठी राज्यतील ८ विभागातील ३८४ खेळाडूंचा थरार रंगणार आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धे चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १३ मे रोजी सायं. ६ वाजता हेंद्रेपाडामधील बदलापूर जिमखाना मैदानावर होईल. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार , कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा श्रीमती रूचिता घोरपडे, क्रीडा सचिव रणजीतसिंह देओल, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, क्रीडा आयुक्त श्रीमती शीतल तेली -उगले आदी मान्यवर उपस्थित रहाणार आहेत.

तब्बल २ वर्षांनंतर होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय




व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी राज्यभरातील खेळाडूंचे आगमन बदलापूर नगरीत झाले आहे. ८ विभागातील ३८४ खेळाडू, ३२ मार्गदर्शक, ३२ व्यवस्थापक, एकूण ४४८ जणांचे पथक स्पर्धेसाठी सज्ज झाले आहे. स्पर्धेत कोल्हापूर, लातूर, अमरावती, संभाजीनगर, पुणे, नागपूर, मुंबई व नाशिक या संघात चुरशीच्या लढती रंगणार आहे. १८ व २१ वर्षांखालील युवकांचा व्हॉलीबॉलचा थरार प्रथमच बदलापूरमध्ये पहाण्यास मिळणार आहे.

मंगळवारी स्पर्धा आढावा बैठकीनंतर कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा श्रीमती रूचिता घोरपडे



बदलापूरमधील राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा मैदानाची पाहणी करताना कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा श्रीमती रूचिता घोरपडे, मुख्याधिकारी मारूती गायकवाड, नगरसेवक किरण भोईर व जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के.

यांनी मैदानाची पाहणी केली.यावेळी मुख्याधिकारी मारूती गायकवाड, नगरसेवक किरण भोईर, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव निलेश जगताप व ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन पदाधिकारी उपस्थित होते.

पहिली छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा १५ ते २१ मे २०११ दरम्यान पुण्यातील बालेवाडी येथे पार पडली. गत दोन वर्षांपूर्वी बुलढाणा येथे स्पर्धा झाली.

भव्य उद्घाटन सोहळ्यात महाराष्ट्रांच्या परंपरेचे दर्शन संध्याकाळच्या सत्रात ४ मैदानात रंगणाऱ्या स्पर्धेतील अडीच हजारपेक्षा अधिक क्षमतेची गॅलरी तयार करण्यात आली आहे. स्पर्धेचे भव्य उद्घाटन १३ मे रोजी सायं. ६ वाजता होणार असून शाहिर नंदेश उमप यांच्या सांस्कृतिक मेजवानीसह जिम्नॉस्टिक्सची चित्तथरारक प्रात्यक्षिके उद्घाटन सोहळ्याचे मुख्य आकर्षण असणार आहे.

आता तब्बल २ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर बदलापूर नगरीत व्हॉलीबॉलचा उत्सव रंगणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदके देणार येणार आहे. साखळी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील विजयी व पराभूत संघ, उपांत्य फेरीतील प्रत्येक विजयी व पराभूत संघ, अंतिम फ रीतील विजयी संघ व अंतिम फेरीतील उपविजयी संघाला रोख बक्षिसे देण्यात येणार असल्याची माहिती उपसंचालक नवनाथ फरताडे यांनी दिली आहे.

# मान्सूनपूर्व तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला सविस्तर आढावा

## सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे – जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

**ठाणे/प्रतिनिधी :** आगामी पावसाळ्यात जिल्ह्यात कोणतीही दुर्घटना होऊ नये, यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी आतापासूनच सतर्क राहून समन्वयाने पूर्वतयारी करावी. जिल्ह्याचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा चोख असावा आणि आपत्कालीन स्थितीत तत्काळ मदतीसाठी आपदा मित्रांची संख्या वाढवावी, असे निर्दे श ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक २०२६ समिती सभागृहात संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळ्यापूर्वी जिल्ह्यातील सर्व धोकादायक पूल, साकव आणि जुन्या इमारतींचे ऑडिट करावे. जलसंपदा विभागाने धरणांची प्रत्यक्ष



पाहणी करून तांत्रिक अहवाल सादर करावा. राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्सून काळात दरडी कोसळण्याच्या घटना लक्षात घेऊन प्रमुख घाटांमध्ये जेसीबी, पोकलेन आणि डंपरची कायमस्वरूपी व्यवस्था करावी.

डॉ.पांचाळ यांनी आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणांची गतिशीलता तपासण्यासाठी अग्निशमन दल, पोलीस आणि आरोग्य विभागाने प्रत्येक तालुक्यात रंगीत तालीम घ्यावी. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागाने औषध साठा आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत अशा सूचना देवून आपत्ती निवारणासाठी आवश्यक साधनसामुग्रीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून अनुदान उपलब्ध करून दिले जाईल,असे स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी यावेळी दरडप्रवण गावे, पूरप्रवण क्षेत्रे, नदीतील गाळ काढणे, औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षा आणि शोध-बचाव साहित्याची उपलब्धता यांचा सविस्तर आढावा घेतला.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे आपत्ती व्यवस्थापन आराखड्याची माहिती दिली. सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना आपापल्या स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने स्थापन करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

### डॉ. प्रतिभाताई अशोकराव थोरात यांचा महायुतीत प्रवेश झाल्याबद्दल त्यांचा सत्कार संपन्न



**केज/प्रतिनिधी :** नुकताच डॉ. प्रतिभाताई अशोकराव थोरात यांनी शिंदे शिवसेनेत पक्षप्रवेश करून त्या महायुतीमध्ये सामील झाल्याबद्दल केज येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा जन विकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे. डॉ. प्रतिभाताई अशोक थोरात या केज येथे आल्या असता ज्येष्ठ नेते डॉ.हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांनी सत्काराचे आयोजन केले होते. या दरम्यान डॉ. प्रतिभाताई थोरात, नगराध्यक्षा डॉ. सौ. सीताताई बनसोड, ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी विविध विषयावर महत्वपूर्ण चर्चा केली. बोलताना डॉ. प्रतिभाताई थोरात म्हणाल्या की, केज शहराच्या विविध विकास कामासाठी व केजच्या विकासाला चालना देण्यासाठी आम्ही हारुणभाई इनामदार व सीताताई बनसोड यांच्या पाठीशी खंबीरपणे महायुती म्हणून उभा आहोत. यावेळी ज्येष्ठ नेते डॉ.हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार, जीशान इनामदार, लकी ट्रेडर्सचे प्रमुख मुफशील शेख, सावळेश्वर चे सरपंच पिंटू मस्के यांच्यासह नगरसेवक व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेलमध्ये पत्रकार उत्कर्ष समितीचा १० वा वर्धापन दिन व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा दिमाखात संपन्न

**पनवेल / प्रतिनिधी :** पत्रकारिता क्षेत्रातील कार्याला प्रेरणा देणारा आणि विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना गौरविणारा पत्रकार उत्कर्ष समिती, महाराष्ट्र राज्य यांचा १० वा वर्धापन दिन व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२६ सोमवार दिनांक ११ मे रोजी पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अत्यंत दिमाखदार आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात ''यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः'' या उक्तीनुसार पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ.ममता प्रीतम म्हात्रे,महिला उत्कर्ष समितीच्या प्रदेश अध्यक्षा डॉ. स्मिता अजय पाटील, उपाध्यक्ष सौ.आरती पाटील,सचिव ॲड एम.दिव्या लोकरे तसेच इतर मान्यवर महिलांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून झाले. त्यानंतर सुमधुर आवाजात गणेश वंदना सादर करण्यात आली. पुढे ''जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा'' या महाराष्ट्र गीताने वातावरण भारावून गेले. गायक अलंकार भोईर व विश्वनाथ गायकवाड यांच्या सादरीकरणाने उपस्थितांच्या मनात अभिमानाची भावना जागृत झाली.

पत्रकार उत्कर्ष समितीचे प्रदेश उपाध्यक्ष दिवंगत राम जाधव यांना यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच समितीतर्फे त्यांच्या पत्नी सौ. निशा जाधव यांचा माहेरवाशिणीचा सन्मान साडी-चोळी देऊन करण्यात आला. या कृतीतून पत्रकार उत्कर्ष समिती आपल्या सहकाऱ्यांना कधीही वाऱ्यावर सोडत नाही, तर त्यांच्या पाठीशी सदैव ठामपणे उभी राहते, हे अधोरेखित झाले.

कार्यक्रमात पत्रकार उत्कर्ष समितीच्या महिला व पुरुष सदस्यांना ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. यानंतर ''पत्रकार उत्कर्ष समिती वर्धापन दिन व पुरस्कार सोहळा स्मरणिका २०२६'' चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

यानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये आदर्श सेवाव्रती पुरस्कार आर्या अजय देशमुख व डॉ. दिपाली उमाळे, लोककला गौरव पुरस्कार दत्ता हरी भोईर व दिगंबर धर्मा कोळी, समाजरत्न पुरस्कार गजानन देशमुख, आदर्श पत्रकार पुरस्कार गणेश राऊत व राजन देसाई, आदर्श शिक्षक



पुरस्कार ज्योती वाघ व सुनील दरवडा, साहित्यरत्न पुरस्कार वृषाली टाकले व सरोज अंदणकर, आदर्श कीर्तनकार पुरस्कार ह.भ.प. नकुल महाराज भोईर व ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे, उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शंकर शिंदे, आदर्श संस्था पुरस्कार स्नेहज्योत संस्था (मुंबई) तसेच कर्तव्यदक्ष अधिकारी पुरस्कार विजयकुमार राठोड यांना प्रदान करण्यात आले.

तसेच ''पंचज्योती सन्मान'' या विशेष राज्यस्तरीय पुरस्काराने पाच मानकरी महिलांचा गौरव करण्यात आला. ॲड. अनिशा फणसळकर यांना ''न्यायज्योत'', मीना घोडविंदे यांना ''सेवाज्योत'', मोनिका शिंपी यांना ''गिरीजन उद्धार ज्योत'', रेखा पाटील यांना ''शृंगार ज्योत'' आणि समता ठाकूर यांना ''ज्ञानज्योत'' गौरव पुरस्कार देण्यात आले.

कार्यक्रमास पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे तसेच शिवसेना (शिंदे गट) पनवेल तालुका अध्यक्ष परेश पाटील यांनी प्रमुख उपस्थिती लावली. त्यांनी आपल्या मनोगतातून पत्रकार उत्कर्ष समितीच्या कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांची समाजाला गरज असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाची रंगत वाढविण्यासाठी लोककलावंत दत्ता हरी भोईर यांच्या ''आई एकविरा सांस्कृतिक कलामंच''च्या टीमने कोळीगीते व बहारदार लावणी सादर करत प्रेक्षकांचे मन जिंकले. या सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृहात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे निवेदन प्रा. अक्षय पाटील (पेण) व पंडित सर (उरण) यांनी अत्यंत प्रभावी व सुरेख शैलीत केले. त्यांच्या निवेदनामुळे कार्यक्रमाची पकड शेवटपर्यंत टिकून राहिली.


या यशस्वी सोहळ्यामागे पत्रकार उत्कर्ष समितीचे सर्वेसर्वा अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या संपूर्ण टीममधील पदाधिकारी, तसेच पत्रकार बंधू-भगिनींनी दिलेला मोलाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरला. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच हा भव्य कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

एकूणच, पत्रकार उत्कर्ष समितीचा हा वर्धापन दिन व पुरस्कार सोहळा केवळ सन्मानाचा नव्हे, तर प्रेरणा देणारा, समाजकार्याला चालना देणारा आणि सांस्कृतिक समृद्धीचा उत्सव ठरला. उपस्थित मान्यवर, पुरस्कारार्थी आणि प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा देण्याची मागणी

## लातूर पत्रकार संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी** : ज्येष्ठ पत्रकार,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य संघटक संजय भोकरे यांना जीवे मारण्याचा कट उघड झाल्याने त्यांना तातडीने झेड प्लस सुरक्षा देण्याची मागणी लातूर पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे, पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य संघटक आणि सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष व दैनिक महानगरी व दैनिक जनप्रवास दैनिकाचे समूह संपादक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट सांगली पोलिसांनी नुकताच उधळून लावला आहे. या प्रकरणात पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून दोन देशी बनावटीची पिस्तूलं, चार जिवंत काडतूसं आणि धारदार चाकू जप्त केला आहे. पोलीस तपासात असे निष्पन्न झाले आहे की, हे आरोपी फेब्रुवारी महिन्यापासून श्री.





भोकरे यांची रेकी करत होते.विशेष म्हणजे, अशाच प्रकारे साधारण वर्षभरापूर्वी त्यांचा मुलगा श्री. सिद्धार्थ संजय भोकरे यांना देखील जीवे मारण्यासाठी पुण्यामधून कट रचण्यात आला होता आणि त्या संदर्भात त्यांना धमकीचे पत्रही प्राप्त झाले होते. यावरून हे स्पष्ट होते की, भोकरे कुटुंबीय हे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या निशाण्यावर आहेत.या हल्ल्याचा कट उघड झाल्यानंतर भोकरे यांनी स्वतः प्लॅन बी नुसार पुन्हा हल्ला होण्याची दाट शक्यता व्यक्त केली आहे. गुन्हेगारांचे धाडस पाहता, त्यांचा प्लॅन बी कार्यान्वित होण्यापूर्वीच शासनाने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. अंबाबाई तालीम संस्थेच्या जमिनी हडपण्याच्या उद्देशाने हा सर्व प्रकार सुरू असल्याचे प्राथमिक तपासात दिसत आहे. निवेदनावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेश उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी, जिल्हा सचिव अशोक हनवते, शहर जिल्हाध्यक्ष महादेव डोंबे, डिजिटल विभागाचे जिल्हाध्यक्ष मनिष हजारे, इले. विभाग जिल्हाप्रमुख हारून मोमीन, जिल्हा कार्यकारिणी सदस्य रामप्रसाद काबरा, मारोती काळे, बालाजी जगदाळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. अशा आहेत मागण्या श्री.भोकरे यांच्या जिवाला असलेला गंभीर धोका लक्षात घेऊन त्यांना तातडीने झेड प्लस संरक्षण प्रदान करण्यात यावे, वर्षभरापूर्वी सिद्धार्थ भोकरे यांना मिळालेल्या धमकीचा आणि आताच्या कटाचा आपसात काही संबंध आहे का, याची सखोल चौकशी व्हावी, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि कटामागील मूळ बोलवता धनी कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

## विष्णू वाघमारे यांनी दहावी शालांत परीक्षेत १०० टक्के गुण घेऊन यश संपादन केले

**लातूर/प्रतिनिधी** : उदगीर येथे भाड्याच्या खोलीत राहून गवंडी काम करणारे श्री. बालाजी वाघमारे ( अनुसूचित जाती) यांचे सुपुत्र तथा उदगीर येथील विद्यावर्धिनी हायस्कूल मधील विद्यार्थी विष्णू बालाजी वाघमारे याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत तब्बल १००% गुण संपादन करून महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गुणवत्तेचा नवा इतिहास रचला आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश संपूर्ण अनुसूचित जातीतील समाजासाठी प्रेरणादायी आहे. विष्णूचे मनःपूर्वक अभिनंदन तसेच त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!



## शिवसेनेच्या वतीने गाव तेथे शाखा व घर तेथे शिवसैनिक अभियान राबविणार: तालुकाप्रमुख बाबुराव शेळके




**लातूर/प्रतिनिधी** : आगामी काळात शहर विधानसभा मतदारसंघात गाव तेथे शाखा व घर तेथे शिवसैनिक हे अभियान लातूर शहर मतदारसंघात राबविण्यात येणार असून लातूर शहर मतदार संघात शिवसेनेची बांधणी भक्कमपणे करून येथे सेनेला चांगले दिवस आणून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू असे प्रतिपादन शिवसेना तालुकाप्रमुख बाबुराव शेळके यांनी लातूर येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना केले. यावेळी शिवसेनेची बुलंद तोफ सोमनाथ स्वामी डिगोळकर, लातूर शहरप्रमुख मोहन दिवटे, शिवसेना पदाधिकारी संतोष पाटील, बाळासाहेब दंडिमे आदी उपस्थित होते. पुढे बोलतांना शेळके म्हणाले की,येणाऱ्या काळामध्ये शिवसेनेची पाळामुळे घराघरापर्यंत पोहोचले पाहिजेत आणि शिवसेना मोठ्या प्रमाणात वाढली पाहिजे यासाठी जीवांचे रान करून शिवसेनेचा भगवा झेंडा आगामी काळात लातूर शहर महापालिका व लातूर शहर विधानसभेत फडकावण्याचा मानस असून त्यासाठी गावागावात शिवसेनेची शाखा व शहरातील प्रभागांमध्ये शिवसेना शाखेचे बांधणी करून येणाऱ्या काळामध्ये शिवसेनेच्या पन्नास शाखा शिवसेना शहर मतदार संघामध्ये स्थापना करण्यासाठी प्रयत्न करणार असून पन्नासाव्या शाखेच्या उद्घाटनासाठी शिवसेनेचे लोकप्रिय खासदार युवा नेते डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना आणण्याचा आम्ही प्रयत्नशील राहू.यावेळी प्रास्ताविकात सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी शिवसेनेचे मुख्य नेते पक्षप्रमुख व राज्याचे कर्तबगार उपमुख्यमंत्री मा ना एकनाथराव शिंदे साहेब यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात केलेल्या जनकल्याणकारी योजनेची माहिती देवून सामान्य माणसाच्या हितासाठी भरीव असे कार्य झाल्याचे सांगुन, पक्ष वाढीसाठी आगामी काळात मोठ्या गतीने प्रयत्न केले जाणार असल्याचे नमुद केले..तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी लातूर शहरात प्रभावीपणे कार्य करू यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत अशी माहिती मोहन दिवटे यांनी यावेळी पत्रकारांना दिली... या पत्रकार परिषदेस मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते...

## लातूर जिल्ह्यात ‘हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान’ अंमलबजावणी सुरु

**लातूर/प्रतिनिधी** : नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोकरा) शेतकऱ्यांना हवामानातील बदलांशी जुळवून घेण्यास सक्षम करण्यासाठी लातूर जिल्ह्यात हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान (सीआरटी) प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. ‘नवीन तंत्रज्ञानाची किमया न्यारी, कमी खर्चात जास्त उत्पन्नाची हमी’ हे ब्रीद घेऊन राबवल्या जाणाऱ्या या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन कृषि विभागाकडून करण्यात आले आहे. हवामानातील वाढती अनिश्चितता आणि एल निनोचा संभाव्य धोका लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न शाश्वत करणे, हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक यांनी पत्राद्वारे सर्व सरपंच महोदयांना या अभियानाचे नेतृत्व करण्याबाबत आवाहन केले आहे. ग्राम कृषी विकास समितीच्या माध्यमातून हे अभियान गावागावांत पोहोचवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शेतकऱ्यांनी रुंद व सरी वरंबे (बेड) तयार करणे, टोकन पद्धतीने लागवड, शून्य मशागत आणि आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा, तसेच पेरणीपूर्वी बियाणे उगवण क्षमता चाचणी व बीज प्रक्रिया करण्यावर भर द्यावा. कीड नियंत्रणासाठी निंबोळी व दशपर्णी अर्क, निमास्त्र, अग्न्यास्त्र यांसारख्या घरगुती अर्कांचा वापर करण्यासह जीवामृत व बीजामृत तयार करून जमिनीचे आरोग्य सुधारावे, असे तंत्रज्ञान सुचवण्यात आले आहे. चिकट सापळे आणि एकात्मिक शेती पद्धतीचा वापर करून खर्च कमी करत उत्पादन वाढवण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे. या अभियानाच्या अधिक माहितीसाठी शेतकरी बांधवांनी आपल्या भागातील सहाय्यक कृषी अधिकारी, समूह सहाय्यक किंवा कृषी ताई यांच्याशी संपर्क साधून खरीप हंगामात प्रत्यक्ष सहभागी व्हावे, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे.




पंतप्रधान मोदी यांनी पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करावा, असे आवाहन केले आहे. एकीकडे शेकडो गाड्यांचा ताफा घेऊन फिरणारे पंतप्रधान जनतेला धडे देत आहेत. त्यांच्या या आवाहनाची अंमलबजावणी सर्वात आधी महापौर आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी करावे, अशी मागणी करीत राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत जिल्हाध्यक्ष मनोज

## विद्यार्थ्यांचे यश हे विद्यार्थी, शाळा, आणि पालकांच्या संयुक्त प्रयत्नाचे फलित : कालिदास माने

### सानेगुरुजी माध्येमिक विदयालयात १० वी गुणवंताचा सत्कार संपन्न

**लातूर/प्रतिनिधी** : इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचे यश हे विद्यार्थी, शाळा आणि पालकांच्या संयुक्त प्रयत्नाचे फलित असून हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून भविष्यातही असेच यश संपादन करून शाळेचे व पालकाचे नाव उज्वल करावे असे गौरवद्गार संस्था सचिव कालिदासजी माने यांनी काढले. ते साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात उद्घाटक म्हणून बोलत होते.

पुढे बोलताना म्हणाले की, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार म्हणजे त्यांच्या मेहनतीचा सन्मान आहे विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मिळवलेल्या यशाचा गौरव करणे ही शाळेची जबाबदारी तर या गुणवत्तेत सातत्य ठेवणे विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे.

या गुणवंत सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, उद्घाटक म्हणून संस्था सचिव कालिदासजी माने तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, विलासराव देशमुख क. महाविद्यालयाचे प्राचार्य विवेक माने, प्रशासकीय अधिकारी नागोराव कांबळे व उषा आडे, स्व. ज्ञानदेवराव माने ज्यू. कॉलेजचे प्राचार्य शरद चव्हाण, नंदादीप माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनिवास राऊत व मुख्याध्यापक इस्माईल शेख, आदी उपस्थित होते.

या सत्कार सोहळ्यात शाळेतून अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय आलेल्या महेश मोहन मरसोने, अनुकल्प तुकाराम लोणे आणि बुशरा इम्रानपाशा शेख यांचा प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या मारोती महादेव जाधव, सुशांत सुधाकर राठोड, महेश्वरी बालाजी आलुरे, प्रांजली नामदेव सूर्यवंशी, प्रशांत राजेश नांदुरे, अभय राम गुडले, श्रद्धा संभाजी बुगनर, गणेश गोपीनाथ ठाकूर, प्राची दादाराव सालगुडे या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी केले तर सूत्रसंचलन गणेश परळे व आभार वैभव धोत्रे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कावळे स्मिता, परळे गणेश, धोत्रे वैभव, गायकवाड राहुल, माने सचिन, जगताप शिवगंगा, काळगापुरे कमल, यादव मिनाक्षी, पवार शशिकांत, डोनगावे कोमल, गायकवाड सतीश, पवार अमोल, पाटील सुनंदा, वडवळे नवनाथ, दयानंद लहाडे, बनसोडे पोर्णिमा, सूर्यवंशी भरत, जाधव सत्यपाल, सावंत बालाजी, सुडे दत्तात्रय, पांचाळ सुर्यकांत आदि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कमल नारायण तावदार यांचे निधन, आज अंत्यसंस्कार



**लातूर/प्रतिनिधी** : लातूर येथील रहिवाशी कमल नारायण तावदार वय ८४ यांचे मंगळवार दि. १२ मे २०२६ रोजी दुपारी २.४० वाजता निधन झाले. त्यांच्यावर बुधवार दि. १३ मे रोजी सकाळी दहा वाजता लातूर जवळील नांदगाव वेस येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात सुन, दोन मुली, जावई व नातवंडे असा त्यांचा परिवार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व्हीएस पँथर्स संघटनेचा सातवा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा संपन्न

## २०० हून अधिक गरजू जोडप्यांना संसारोपयोगी साहित्यांसह दिला आधार

‘‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व्हीएस पँथर्स संघटनेचा सातवा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा संपन्न; २०० हून अधिक गरजू जोडप्यांना संसारोपयोगी साहित्यांसह दिला आधार’’

व्हीएस पँथर्स संघटना ही फक्त एक संघटना नसून महापुरुषांच्या विचारांवर चालणारी एक सामाजिक चळवळ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त इतरत्र होणारे डॉल्बी, दिखाऊ कार्यक्रम व अनावश्यक खर्च टाळून समाजातील गोरगरिबांच्या लेकरांसाठी समाजोपयोगी कार्य करण्याचा आदर्श व्हीएस पँथर्स संघटनेने उभा केला आहे.

व्हीएस पँथर्स संघटनेतर्फे आयोजित करण्यात आलेला सातवा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा हा खऱ्या अर्थाने समाजकारणाचा आदर्श नमुना ठरला आहे. विनोद भाऊ खटके यांनी आपल्या कार्यातून सर्व समाजातील व्यक्तींना, तसेच राजकीय नेते, आमदार, खासदार आणि सामाजिक कार्यकर्त्यांना हे दाखवून दिले आहे की समाजकारण म्हणजे केवळ भाषणे किंवा प्रसिद्धी नसून गोरगरिबांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणे हेच खरे समाजकारण असते.

आजपर्यंत व्हीएस पँथर्स संघटनेच्या माध्यमातून सुमारे २०० ते २५० गरजू जोडप्यांचे विवाह लावून देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे या विवाह सोहळ्यात केवळ विवाह लावून दिले जात नाहीत, तर नवदांपत्यांना संसारोपयोगी साहित्य जसे की पलंग, गादी, मंगळसूत्र, कपडे, चप्पल, भांडी, किराणा साहित्य व इतर आवश्यक वस्तू निशुल्क देण्यात येतात. तसेच विवाहासाठी येणाऱ्या पाहुण्यांच्या जेवणाची व निवासाची व्यवस्थाही संघटनेतर्फे केली जाते.

संघटनेचे कार्य केवळ विवाह सोहळ्यापुरते मर्यादित नसून वर्षभर समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवले जातात. रक्तदान शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, शालेय साहित्य वाटप, गरीब रुग्णांना औषधोपचारासाठी आर्थिक मदत, शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत अन्नदान, बेरोजगार युवकांना मार्गदर्शन, महिलांसाठी जनजागृती अभियान, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण तसेच सुरू आहे.

समाजातील वंचित, उपेक्षित व गोरगरिबांच्या वेदना जाणून त्यांना आधार देण्याचे कार्य व्हीएस पँथर्स सुरू आहे.घटना करत आहे. बाबासाहेबांनी दिलेला ‘‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’’ हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचे काम विनोद भाऊ खटके व सचिन भाऊ करत आहेत. सचिन भाऊ म्हणजे विनोद भाऊंच्या प्रत्येक सामाजिक कार्यात खंबीरपणे साथ देणारा मित्र आणि समाजकारणासाठी स्वतःला वाहून घेतलेला कार्यकर्ता. या सातव्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करणारे सर्व दाते, पोलीस प्रशासन, पत्रकार बांधव, महानगरपालिका प्रशासन, सामाजिक कार्यकर्ते व सर्व सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार.

अशा या समाजहिताच्या कार्यातून व्हीएस पँथर्स संघटना आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. गोरगरिबांच्या आयुष्यात आनंद निर्माण करणारे विनोद भाऊ खटके व सचिन भाऊ यांचे सामाजिक कार्य असेच दिवसेंदिवस वाढत राहो हीच सदिच्छा.



ॲड.रमक राजाभाऊ जोगदंड

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.